**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**Email ID** : sodesk१.tdd@**nic.in** **दूरध्वनी क्र.०२२-२२७९३०३१**

क्र.वाहन-२०२५/प्र.क्र.१९६/का.१, दिनांक :- ०८ डिसेंबर, २०२५.

# निविदा सूचना

आदिवासी विकास विभागातील वाहन क्र.एम.एच. ०१, ए.एन. ८८८८ (होंडा सिटी) व वाहन क्र.एम.एच.०१, ए.बी. ०९०९ (COROLLA ALTIS) या दोन जुन्या वाहनाच्या विक्रीकरिता मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

२. सदर निविदा कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, दालन क्र.१३१, पहिला मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई या पत्त्यावर, दि.१६ डिसेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने मोहोरबंद पाकिटात पाठवाव्यात. विहित वेळेत प्राप्त निविदा दि.१७ डिसेंबर, २०२५ रोजी दूपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार विभागाकडे राखून ठेवण्यात आलेला आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

(शैला मिठबावकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

d:\ajay gavade tdd\वाहन\वाहनाचा लिलाव करणेबाबत....docx

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**Email ID :** sodesk१.tdd@nic.in
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३०३१

क्र.वाहन-२०२५/प्र.क्र.१९६/का.१,

दिनांक :- ०४ डिसेंबर, २०२५.

## निविदे संदर्भात नियम व अटी

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १. | दोन स्वतंत्र मोहोरबंद पाकीटात निविदा समक्ष/ पोस्टाव्दारे दिनांक ०५.१२.२०२५ ते १६.१२.२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कक्ष अधिकारी (का.१), दालन क्रमांक १३१ (विस्तार), पहिला मजला, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२ येथे सादर करावी. त्यावर "वाहन क्र.एम.एच. ०१, ए.एन. ८८८८ (होंडा सिटी)" व "वाहन क्र.एम.एच.०१, ए.बी. ०९०९ (COROLLA ALTIS), या वाहनाच्या विक्रीसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २. | "जशा आहेत तशा स्थितीत" विक्रीकरिता असलेली वाहन क्र.एम.एच. ०१, ए.एन. ८८८८ (होंडा सिटी)" हे तपासणीसाठी महाराष्ट्र विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे ठेवण्यात आले आहे. व "वाहन क्र.एम.एच.०१, ए.बी. ०९०९ (COROLLA ALTIS), हे वाहन तपासणीसाठी डंम्पींग यार्ड, माहुलगाव येथे ठेवण्यात आले आहे. |
| ३. | ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दिनांक १६.१२.२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. |
| ४. | इसाऱ्याची रक्कम रु.२०००/- (प्रत्येक निविदेस), कार्यासन अधिकारी, रोखशाखा, आदिवासी विकास विभाग, दालन क्रमांक १३१ (विस्तार), पहिला मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२ यांच्याकडे जमा करावी. |
| ५. | इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर कार्यासन अधिकारी, रोखशाखा, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेली पावती, निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ६. | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर रहाता येईल. |
| ७. | यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याच्या रकमेस त्यास मुकावे लागेल. |

| | |
|---|---|
| ८. | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) भरावा लागेल. तसेच वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल. |
| ९. | यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १०. | दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, overwriting,पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसेच करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. |
| ११. | कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार विभागाकडे राहिल. |
| १२. | शासकीय "वाहन क्र.एम.एच. ०१, ए.एन. ८८८८ (होंडा सिटी)" व "वाहन क्र.एम.एच.०१, ए.बी. ०९०९ (COROLLA ALTIS), या दोन वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |

- **वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | वाहनाचा तपशील |
|---|---|
| १. | Vehicle No. : MH 01 AN 8888 |
| २. | Model : NEW HONDA CITY 1.5 V MT |
| ३. | Engine No .:L15A71215499 |
| ४. | Chassis No: MAKGM253FAN107864 |
| ५. | Class : LMV |
| ६. | MFG CD : HONSCL |
| ७. | Product Year (Vehicle Purchase year) : 2010 |
| ८. | आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : १,२१,३८१ KM |

| अ.क्र. | वाहनाचा तपशील |
|---|---|
| १. | Vehicle No. : MH 01 AB 0909 |
| २. | Model : Toyota Corolla Altis 1.4 G (HN) diesel |
| ३. | Engine No .:1ND1283074 |
| ४. | Chassis No: MBJ53NEE004012876 |
| ५. | Class : - LMV |
| ६. | MFG CD : - TOYKIR |
| ७. | Product Year (Vehicle Purchase year) : 2012 |
| ८. | आतापर्यंत चालविलेले वाहनाचे अंतर : १,४०,२७१ KM |

- **वाहन क्र.एम.एच. ०१, ए.एन. ८८८८ (होंडा सिटी) ची मूळ खरेदी किंमतीच्या रु.७,४९,९५०/- नुसार १०% नुसार रु.७४,९९५/- इतकी लिलावाची किंमत होईल.**
- **वाहन क्र.एम.एच.०१, ए.बी.०९०९ (COROLLA ALTIS) ची मूळ खरेदी किंमतीच्या रु.१४,०३,५६४/- नुसार १०% नुसार रु.१,४०,३५६/- इतकी लिलावाची किंमत होईल.**

- **दरपत्रकधाराकांनी सादर करावयाची कागदपत्रे :**

१. खरेदीदाराचे दोन पासपोर्ट फोटो.
२. ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड/आधारकार्ड/ पासपोर्ट/ मतदार ओळखपत्र इ. यापैकी कोणतेही एक.)
३. कंपनी/ फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तु व सेवाकर अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
४. इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक

- **दरपत्रक पाठविणेकरीता व उघडणेकरीता हजर रहावयाचा पत्ता**

कक्ष अधिकारी (का.१), आदिवासी विकास विभाग,

दालन क्र.१३१, मंत्रालय विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई.

**महत्वाच्या दिनांक व वेळ :**

१. दरपत्रके सादर करण्याचा पहिला दिनांक : ०५.१२.२०२५ वेळ सकाळी ९.४५
२. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक : १६.१२.२०२५ वेळ सायं. ६.१५
३. दरपत्रके उघडण्याकरीता दिनांक : १७.१२.२०२५ वेळ सायं.३.०० वा.

(शैला मिठबावकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. कार्यासन अधिकारी, रोखशाखा, आदिवासी विभाग,मंत्रालय, मुंबई.

## दरपत्रक सादर करण्याकरिता नमूना

| | निविदा क्रमांक | | १ |
|---|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव | : | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | : | |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | : | |

प्रति,

कक्ष अधिकारी (का.१)
दालन क्रमांक १३१ (विस्तार), पहिला मजला,
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०००३२.

विषय :- शासकीय वाहन क्र.एम.एच. ०१, ए.एन. ८८८८ (होंडा सिटी) या वाहनाच्या विक्रीबाबत.

महोदय,

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली जाहिरात क्र: वाहन-२०२५/प्र.क्र.१९६/का.१ नुसार सदरचे दरपत्रक सादर करीत आहे. जाहिरातीमध्ये नमुद अटीं व शर्तीनुसार खालील नमूद केलेले वाहन त्यासमोर नमूद केलेल्या किंमतीस जसे आहे, त्या स्थितीत खरेदी करू इच्छितो. सदरचे वाहन खरेदी नंतर हस्तांतरण नोंदणीकरीता होणारा सर्व खर्च मी/ आम्ही स्वखर्चाने करणार आहे/ आहेत.

२. उपरोक्त वाहनाच्या बोली रकमेवर आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारा आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरण्यास माझी संमती आहे.

३. जाहिरातीतधील नमूद सर्व सूचना, अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहेत.

वाहन क्र. ----------------------------------------------

बोली रक्कम: -------------------------------------------

आपला,

दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव व सही
संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक.

**टिप :-** कंपनीच्या वतीने वाहन खरेदी केल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक प्रामुख्याने देण्यात यावा.

## दरपत्रक सादर करण्याकरिता नमूना

| | **निविदा क्रमांक** | | **१** |
|---|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव | : | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | : | |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | : | |

प्रति,

कक्ष अधिकारी (का.१)
दालन क्रमांक १३१ (विस्तार), पहिला मजला,
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०००३२.

विषय :- शासकीय वाहन क्र. एम.एच.०१, ए.बी. ०९०९ (COROLLA ALTIS) या वाहनाच्या विक्रीबाबत.

महोदय,

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली जाहिरात क्र. वाहन-२०२५/प्र.क्र.१९६/का.१, नुसार सदरचे दरपत्रक सादर करीत आहे. जाहिरातीमध्ये नमुद अटीं व शर्तीनुसार खालील नमूद केलेले वाहन त्यासमोर नमूद केलेल्या किंमतीस जसे आहे, त्या स्थितीत खरेदी करू इच्छितो. सदरचे वाहन खरेदी नंतर हस्तांतरण नोंदणीकरीता होणारा सर्व खर्च मी/ आम्ही स्वखर्चाने करणार आहे/ आहेत.

२. उपरोक्त वाहनाच्या बोली रकमेवर आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारा आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरण्यास माझी संमती आहे.

३. जाहिरातीतधील नमूद सर्व सूचना, अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहेत.

वाहन क्र. ------------------------------------------------

बोली रक्कम: --------------------------------------------

आपला,

दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव व सही
संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक.

**टिप :-** कंपनीच्या वतीने वाहन खरेदी केल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक प्रामुख्याने देण्यात यावा.